# प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी हा ललित वाङ्मयप्रकार म्हणून ओळखला जातो. जीवनाच्या सुख दुःखाबरोबरच मानवी जीवनाचा विशालपट उभा करण्याचे सामर्थ्य या वाङ्मयप्रकारात आहे. कादंबरीचे दालन हे वेगवेगळ्या अंगांनी समृद्ध झाले आहे. पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक अशा विविध प्रकारातून वेगवेगळे अनुभव कादंबरीतून व्यक्त होताना दिसतात. यामुळेच अन्य वाङ्मयप्रकाराच्या तुलनेत कादंबरी ही श्रेष्ठ ठरताना दिसते. साठोत्तर मराठी कादंबरीमध्ये वेगवेगळे प्रवाह अस्तित्वात आले. त्यातीलच एक प्रवाह म्हणजे ग्रामीण साहित्य होय. या साहित्यातून ग्रामीण कादंबरीने प्रभावीपणे ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. या काळात अनेक वेगवेगळ्या लेखकांनी लेखन केलेले दिसते. त्यातील एक महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणून शेषराव मोहिते यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधात **'शेषराव मोहिते यांच्या कादंबरीलेखनाचा अभ्यास'** ('असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' च्या आधारे) या शीर्षकातंर्गत एकूण पाच प्रकरणामध्ये करण्यात आला आहे. प्रस्तुत **'उपसंहार'** या प्रकरणामध्ये आतापर्यंतच्या विवेचनातून हाती आलेले निष्कर्ष मांडावयाचे आहेत.

**'मराठी कादंबरीचे स्वरूप आणि वाटचाल'** या पहिल्या प्रकरणामध्ये मराठी कादंबरीचे स्वरूप आणि वाटचाल अभ्यासली आहे. मराठी कादंबरीचे स्वरूप अभ्यासत असताना कादंबरीची संकल्पना स्पष्ट केली आहे. 'कादंबरी' ही विशिष्ट संज्ञा ज्या साहित्यप्रकारात दिली जाते तो पाश्चात्य वाङ्मयाच्या इतिहासात १८ व्या शतकात तर मराठी वाङ्मयाच्या इतिहासात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात

अस्तित्वात आला आहे. कादंबरीला इंग्रजीमध्ये 'नॉव्हेल' म्हणून संबोधले जाते. 'नॉव्हेल' वरून 'नावल' हा शब्द अस्तित्वात आला आहे. त्यासाठी 'Fiction' ही संज्ञाही वापरली जाते. असे असले तरी संस्कृत कवी बाणभट्टने त्यांच्या लेखनातील नायिकेला दिलेले 'कादंबरी' हे नाव मराठी वाङ्मय प्रकार म्हणून रुढ झाले. हा शब्द 'नॉव्हेल' या इंग्रजी शब्दाला पर्यायी शब्द म्हणून रूढ झाला आहे. 'मानवी जीवनावर भाष्य करणारी, आशयद्रव्य, प्रसंग, पात्र, वातावरण इ. घटकांचा अंतर्भाव असणारी, विस्तृत मानवी जीवनपट उलगडणारी व उत्तरोत्तर नवनवीन बदल आत्मसात करणारी साहित्यकृती म्हणजे कादंबरी होय', असे सर्वसाधारणपणे कादंबरीविषयी म्हणता येईल. कादंबरीचे कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, संवाद, निवेदन, भाषाशैली इ. महत्त्वपूर्ण घटक मानले जातात.

मराठी कादंबरी लेखनाची सुरूवात ही इ. स. १८४१ साली प्रसिद्ध झालेल्या हरि केशवजी यांच्या 'यात्रिक क्रमण' या भाषांतरित कादंबरीने झालेली पहावयास मिळते. असे असले तरी मराठीतील पहिती स्वतंत्र कादंबरी म्हणून बाबा पद्मनजी यांच्या 'यमुनापर्यटन' (१८५७) या कादंबरीला मान दिला जातो. यानंतर इ. स. १८६१ साली प्रसिद्ध झालेली 'मुक्तामाला' ही हळबेशास्त्री यांची मराठीतील पहिली अद्‌भुतरम्य कादंबरी ठरते. सदाशिव रिसबूड यांची 'मंजूघोषा', लक्ष्मण जोगवेकर यांची 'विचित्रपुरी' (१८७०) इ. कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

इ. स. १८८५ ते १९२० या कालखंडाने खऱ्या अर्थाने मराठी साहित्याचा पाया भरण्याचे काम केले आहे. प्रस्तुत कालखंडाचा उल्लेख हरिभाऊंचा कालखंड म्हणून केला जावा, एवढा त्यांच्या लेखनाचा प्रभाव या कादंबऱ्यांवरती पडलेला दिसतो. उदा. 'मधली स्थिती', 'पण लक्षात कोण घेतो' या त्यांच्या अत्यंत लोकप्रिय कादंबऱ्या आहेत. याशिवाय या कालखंडात लेखन करणारे कादंबरीकार म्हणून वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, नाथमाधव, वि. सी. गुर्जर यांचाही उल्लेख करता येईल.

१९२० ते १९४७ हा कालखंड फडके–खांडेकर–माडखोलकर यांच्या नावाने ओळखला जातो. त्यांनी कादंबरीतून कलावाद, जीवनवाद, राजकारण मांडले. हा कालखंड मराठी कादंबरीच्या इतिहासामध्ये अनेक दृष्टींनी महत्त्वाचा ठरलेला आहे. या कालखंडात ना. ह. आपटे, पु. य. देशपांडे, सानेगुरूजी, वि. वा. हडप, र. वा. दिघे इ. कादंबरीकारांनी लेखन केले.

१९४७ ते १९६० हा कालखंड साठोत्तर मराठी कादंबरीच्या पायाभरणीचा कालखंड म्हणनू ओळखला जातो. या काळात फडके–खांडेकर प्रणीत कादंबरी बदलून ती अधिक वास्तवाभिमूख झालेली पहावयास मिळते. साठोत्तर मराठी कादंबरी वेगळी संवेदना, भान आणि आपली स्वतंत्र वाट शोधताना दिसते. तिने समाज जीवनाच्या अनेक अंगांना स्पर्श केलेला दिसतो. रंजनवादी, ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, अस्तित्ववादी, स्त्रीलिखित, दलित, ग्रामीण अशा विविध प्रवाहातून कादंबरीने प्रवास केला. साठोत्तर मराठी कादंबरीमध्ये शेषराव मोहिते एक महत्त्वपूर्ण ग्रमीण कादंबरीकार ठरतात. त्यांच्या 'असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' या दोन कादंबऱ्या प्रसिध्द आहेत.

**"असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' मधील आशयसूत्रे'** या दुसऱ्या प्रकरणामध्ये शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यातील आशयसूत्रे अभ्यासण्यात आली आहेत. त्यांच्या दोन्ही कादंबऱ्यातून प्रामुख्याने कृषीजीवनाशी निगडित असणारा आशय व्यक्त झाला आहे. शेषराव मोहिते यांचे बालपण हे ग्रामीण भागातच गेलेले आहे. 'सावकारी ओझ्याखाली आलेल्या शेतकऱ्याचे जीवन' या आशयसूत्रातून शेषराव मोहिते यांनी सावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्याचे जीवन चित्रित केले आहे. शेती करीत असताना, कुटुंब चालवत असतानाच सावकारी पाशाने शेतकऱ्याचे होणारे हाल येथे व्यक्त झाले आहे. हरिबासारखा शेतकरी सावकारी कर्जाचा शिकार कसा होतो याचे वास्तव या कादंबरीतून मांडले आहे.

'शेतकऱ्याचे स्वाभिमानी जगणे' या आशयसूत्रातून शेतकऱ्याचा स्वाभिमान दिसून येतो. शेतकऱ्यावर कितीही समस्या, संकटे आली तरी त्यावर मात करून स्वाभिमानाने जीवन जगताना दिसतो. तो कधीही कोणाची लाचारी पत्करत नाही. 'शेतकऱ्याचे कष्ट' यामध्ये शेतकऱ्याला आहोरात्र करावे लागणारे कष्ट येते. आपल्या कुटुंबासाठी शेतामध्ये राबराब राबणारा शेतकरी आणि पोटासाठी मजुरी करून भूक भागवणाऱ्या मजुराचेही कष्ट येथे आले आहे.

शेतकरी शेतीमध्ये रात्रंदिवस कष्ट करीत असतो. तसेच शेतीवर येणाऱ्या अनेक संकटांना त्याला तोंड द्यावे लागते. शेतीवरील या वेगवेगळ्या संकटांमुळे शेतकऱ्याला शेती करणे असह्य होते. याचे वास्तव 'शेतीवरील अस्मानी व सुलतानी संकटांमधून' चित्रित झाले आहे.

ग्रामीण तरुण शिक्षण घेवून नोकरीला लागतो, कृषी पदवी घेतो. हा शिक्षित, नोकरदार तरुण आपली कृषीसंस्कृतीशी जुळलेली नाळ तोडू शकत नाही. याचे प्रत्यंतर 'शिक्षित तरुणाचे शेतीवरील प्रेम' या आशयसूत्रातून येते.

भ्रष्ट शासन, प्रशासन, व्यक्ती आणि समाज यांचा त्रास शेतकऱ्याला कसा सहन करावा लागतो हे 'धूर्त आणि भ्रष्टाचारी प्रशासन' मधून दिसते. तर शेतकऱ्याची अनेक स्थरावर कशा पद्धतीने फसवणूक केली जाते याचे वास्तव 'शेतकऱ्याची फसवणूनक' मधून व्यक्त झाले आहे. शेतकरी कुटुंबातील कष्टकरी स्त्री, पुरूषाच्या मागे धैर्याने उभा राहणारी स्त्री, तसेच संकटाच्यावेळी पुरूषाला धीर देणारी, मार्गदर्शन करणारी आणि शेतीसुधारणेसाठी धडपडणारी ग्रामीण स्त्री शेषराव मोहिते यांच्या कादंबरीत आलेली दिसते. शिक्षण की शेती या मानसिक घालमेलीत अडकलेल्या तरूणाच्या मनाचा गोंधळ 'शिक्षित तरूणाची मानसिक घालमेल' या आशयसूत्रातून व्यक्त झाला आहे. शेती सुधारणेसाठी घेतलेले शिक्षण निरर्थक ठरते तेव्हा हा शिक्षित तरूण शेतीपासून, घरापासून कसा तुटत जातो हे 'शिक्षित तरूणाचे गावापासून तुटलेपण' मधनू दिसते.

शिक्षणातील निष्क्रीयता, बेजबाबदार शिक्षक आणि प्राध्यापक हे 'शिक्षणव्यवस्थेमधील निरर्थकता' मधून व्यक्त होते. शेतीची सद्यस्थिती, शेतीतील उत्पादन आणि बाजारभाव यातील तफावत व ढासळत जाणारे कृषीजीवन हे 'शेतीव्यवस्थेचे वास्तव' मध्ये मांडले आहे. शिक्षण घेतल्यानंतर ग्रामीण तरुणामध्ये चांगले आणि वाईट, दोन्ही बदल कशा पद्धतीने होतात याचे वास्तव 'शिक्षणामुळे झालेला बदल' या आशयसूत्रातून व्यक्त होते. अशा विविध आशयसूत्रांच्या सहाय्याने शेषराव मोहिते यांनी कथानक समृद्ध केले आहे.

शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यांतील आशय हा कृषीसंस्कृती, ग्रामीण जीवनाशी संलग्नित आहे. कृषीजीवनाचे सखोलपणे निरीक्षण केल्याने त्यासंबंधीचे चित्रण कादंबरीत आल्यामुळे आशयाला व्यापकता प्राप्त झाली आहे. ग्रामीण जीवनातील सूक्ष्म निरीक्षणामुळे त्यांचे लेखन वास्तवाभिमूख झाले आहे. मानवी जीवनातील समस्या, कारुण्य, शेतकऱ्याच्या असह्य जीवनाचा पट उलगडून दाखवताना वाचकांना अंतर्मूख करण्याचे सामर्थ त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये जाणवते.

पारंपरिक एकत्र कुटुंबपद्धती, कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याचे जीवन, शेतकरी कुटुंबातील शिक्षित तरुण आणि शेती यांचा एक पटच लेखकाने चित्रित केला आहे. आधुनिक युगात जीवन जगत असताना शेतकरी कुटुंबातील विविध समस्यांचा वेधही घेण्याचा प्रयत्न शेषराव मोहिते यांनी केला आहे. या काळातील शिक्षित तरुण, शेतीसंस्कृती आणि गावापासून तूटत जाणे याचाही वेध येथे घेतला आहे.

शेषराव मोहिते यांनी आपल्या कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनाबरोबरच समाजकारण, राजकारण, प्रचलित शासनव्यवस्था, अनियमित निसर्ग, शिक्षण व्यवस्था यावरही प्रकाश टाकला आहे. तसेच शेतकरी कुटुंबातील पुरुष संकटापासून जेव्हा पळ काढतो तेव्हा घरातील स्त्री कशी खंबीरपणे उभी राहते याचे वास्तव या कादंबरीतून मांडून पुरुषप्रधान संस्कृतीवरही प्रकाश टाकला आहे.

अशाप्रकारे शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यांमध्ये आशयमूत्रे आढळून येतात. प्रत्येक आशयसूत्रांमध्ये वेगळेपण जाणवते. त्यांच्या कादंबरी लेखनाला अनुभवाचे व्यापकत्व लाभल्यामुळे ती वास्तवाभिमूख झालेली आहे. त्यांच्या लेखनामध्ये मनोरंजकतेला थारा दिलेला नाही. कादंबरीलेखन करताना संयमाचा तोल ढळू दिलेला नाही.

तिसऱ्या प्रकरणामध्ये **'शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा'** अभ्यासल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यातील जवळपास सर्वच व्यक्तिरेखा या कृषीजीवनाशी बांधल्या गेलेल्या आहेत. काही व्यक्तिरेखा या शिक्षणक्षेत्रातील किंवा कृषीविद्यापीठातील शिक्षण घेतलेल्या असल्यामुळे अप्रत्यक्षरीत्या त्या शेतीशी संबंधीत आहेत. उदा. श्रीराम, अजय व चांगदेव, कष्टाळू पण कधी-कधी पळ काढणारा, शेतीवर तेवढेच प्रेम करणारा, प्रामाणिक पण कर्जबाजारी झालेला हरिबा, शेतकरी कुटुंबाला सांभाळून घेणारी कासा, कर्जाला कंटाळून आत्महत्या करणारा हाणमू, शेतकऱ्याला कर्जात अडकवून त्यांच्या जमिनी बळकावणारा विष्णू कारभारी, शिक्षण घेऊन कुटुंबाला गरिबीतून वर काढणारा गोपाळ गुरूजी, शेतामध्ये सतत कष्ट करणारा अशिक्षित नामू, नामुबरोबर शेतात राबणारी त्याची आडाणी बायको धुरपा, श्रीमंतांच्या घरची असूनही शेतकरी कुटुंबात स्वाभिमानाने जीवन जगणारी शांता, याशिवाय इतर काही व्यक्तिरेखा उदा. नारायण बेरड, कोंडीबा सावकार, केशव पाटील, माणिकराव पाटील, म्हादा व रखमा हे शेषराव मोहिते यांच्या कादंबरीत आढळतात.

मानसिक घालमेलीत जगणारा आणि शेतीपासून, घरापासून तुटला जाणारा श्रीराम हा तरूण 'धूळपेरणी' या कादंबरीचा नायक आहे. बैलांबरोबरच रात्रंदिवस शेतात राबणारे श्रीरामचे वडील आबा, शिक्षणाचे महत्त्व समजलेली व कुटुंबाला धीर देणारी बाई, शिक्षित आणि नोकरदार असतानाही कुटुंबासाठी, शेतीसाठी धडपडणारा आप्पा मास्तर, रगेल आणि रंगेल व्यक्तिमत्व असणारा पप्पा, नायक

श्रीरामला स्वत्वाची जाणीव करून देणारे अजय आणि चांगदेव, विठ्ठलाचे वारकरी आणि कुटुंबांतील सर्वात वयोवृद्ध असणारे दादा, आपल्या डोळ्यासमोर श्रीरामचे लग्न व्हावे ही इच्छा असणारी आक्का, परभणी कृषीविद्यापीठाचे कार्यशील, धुरंधर कुलगुरू डॉ. डी. के. साळुंखे अशा व्यक्तिरेखा 'धूळपेरणी' मध्ये आढळतात.

चौथ्या प्रकरणामध्ये **'शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यांचे रचनाविशेष'** अभ्यासले आहे. शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यांची कथानक रचना ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीमध्ये एकूण ३६ प्रकरणे असून ती अतिशय सूत्रबद्धरीत्या एकमेकांशी बांधली गेलेली आहेत. या कादंबरीतून ग्रामीण जीवन प्रकर्षाने चित्रित झाले आहे. कादंबरीची सुरूवात कर्जबाजारी शेतकऱ्याच्या जीवनापासून तर शेवट नवीन पिढीतील तरुणाच्या जन्माने होतो. याठिकाणी कादंबरीच्या अंतिम टप्यात आशेचा किरण दाखवण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला दिसतो. 'धूळपेरणी' ही मोहिते यांची पाच भागामध्ये विभागलेली कादंबरी आहे. ही श्रीराम या शिक्षित तरूणाची आत्मपर कहाणी आहे. या कादंबरीचे कथानक हे ग्रामीण आणि नागरी भागात घडलेले आहे. कादंबरीचा नायक शहरी भागात शिक्षण घेत असल्यामुळे नागरी वातावरणाचा परिणाम या कादंबरीवर झालेला दिसतो.

शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यातील वातावरण आणि प्रसंग कथानकाशी व आशयाशी एकरूप झालेले दिसतात. त्यांनी प्रसंगाला अनुरूप अशीच वातावरणनिर्मिती केलेली आहे. वातावरण आणि प्रसंगामुळे कथानक समृद्ध होण्यास मदत झाली आहे.मोहिते यांच्या कादंबऱ्या ग्रामीण भागातील असल्यामुळे ग्रामीण वातावरणाची पार्श्वभूमी त्यांच्या कादंबऱ्यांना लाभली आहे.

बारीक-सारीक तपशीलासह केलेल्या व्यक्तिंच्या वर्णनातून व्यक्तीचे वय, शरीर, स्वभाव, भाषा, शिक्षण, व्यवसाय इ. गुणविशेष चित्रित झाले आहेत. शेषराव मोहिते व्यक्तिच्या बाह्यवर्णनामध्ये अधिक गुंतून न राहता व्यक्तिच्या अंतर्मनाचा वेध घेताना दिसतात.

'धूळपेरणी' या आत्मनिवेदनात्मक कादंबरीसाठी प्रथमपुरूषी निवेदन पद्धती तर 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीसाठी सर्वसाक्षी, सर्वज्ञ अशी 'तृतीयपुरूषी' निवेदनपद्धती अवलंबली आहे. निवेदनासाठी आशयाला अनुरूप असा भाषेचा वापर केलेला आहे. यामध्ये घोटीवपणा जाणीवपूर्वक टाळला आहे. तसेच त्यांनी खेडूत, ग्रामीण आणि नागरी वळणाची शैली वापरून कादंबरीची परिणामकारकता वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. प्रश्नार्थक शैलीमुळे पात्रांच्या मनातील सूक्ष्म विचार समजण्यास मदत होते. तसेच काही अन्य भाषेतील शब्दांचाही निवेदनामध्ये उपयोग केला आहे. यामध्ये हिन्दी, इंग्रजी, कन्नड अशा भाषेतील शब्द सहजपणे आलेले दिसतात.

शेषराव मोहिते यांनी संवादासाठी पात्रानुरूप भाषेचा वापर केलेला दिसतो. ग्रामीण बोली, विशेषत: मराठवाडी-कानडी सीमाभागातील कथानक असल्यामुळे प्रादेशिक बोलीचा प्रभाव संवादावर झालेला आढळतो. नाट्यपूर्ण संवाद आणि निवेदनातील सहजता हे शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यांचे विशेष मानता येतील. ग्रामीण भाषेचे एक स्वतंत्र रूप त्यांच्या कादंबऱ्यांत दिसून येते.

शेषराव मोहिते यांनी या कादंबऱ्यांमध्ये समर्पक अशा उपमांची योजना केलेली आहे. अर्थपूर्ण अशा उपमांमध्ये विविधता जाणवते. उदा. 'भिजलेल्या ढेकळासारखे', 'जड आलेल्या बाईसारखी'. अशा उपमांबरोबरच निवेदनामध्ये म्हणी आणि वाक्प्रचार यांच्या केलेल्या वापरामुळे भाषेमध्ये नेमकेपणा येण्यास आणि भाषेचे सौंदर्य वाढण्यास मदत झाली आहे. तसेच 'असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' यांच्या शीर्षकातील समर्पकताही वाखाणण्यासारखी आहे. कादंबऱ्यांचा आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य या शीर्षकांमध्ये आहे.

शेषराव मोहिते हे वास्तव आणि परखड पातळीवरून लेखन करताना दिसतात. ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतकरी कुटुंबातील शिक्षित तरुण पिढीचे चित्रण 'धूळपेरणी' आणि 'असं जगणं तोलाचं' या कादंबऱ्यातून आले

आहे. शेतकऱ्याचे दारिद्र्य, कर्जबाजारी शेतकरी, स्वाभिमानी शेतकरी, शिक्षित तरुणाची मानसिक घालमेल इ. प्रश्नांचा नव्याने वेध घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. अशा स्वरूपाचे कथानक मराठी ग्रामीण साहित्यात अभावानेच आढळते. हे लेखन करीत असताना घटना, प्रसंग, भाषा, शब्दरचना, म्हणी वाक्प्रचार यांचा केलेला समर्पक वापर कादंबरीतील कथानकास उपयुक्त ठरतो.

शेषराव मोहिते कादंबरीचे चित्रण करीत असताना व्यक्तिचित्रणाबरोबरच त्यांच्या भोवतालचा परिसरही आपल्या लेखनीच्या सहाय्याने जिवंत करतात. वारंवार पडणारे दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांची होणारी मोठ्या प्रमाणातील हानीही वाचकाला अंतर्मुख केल्याशिवाय राहत नाही हे त्यांच्या कादंबऱ्यांचे विशेष होय. शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास केल्यानंतर निष्कर्ष स्वरूपात पुढील बाबी नोंदविता येतात.

**निष्कर्ष**

१. शेषराव मोहिते हे ग्रामीण कादंबरीकार आहेत. त्यानी या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडवले आहे.

२. 'धूळपेरणी' ही कादंबरी काही अंशी नागरी जीवनाकडे झुकताना दिसते. त्यामुळे नागरी जीवनाचे बारकावेही या कादंबरीतून टिपण्याचा प्रयत्न केला आहे.

३. शेषराव मोहिते यांच्या 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीमध्ये शेतकऱ्यांच्या समस्यांवर अधिक भर दिल्याचे दिसून येते. या कादंबरीमध्ये शेती आणि शेतकरी यांचा अतुट संबंध यात दाखवला आहे. शेतकऱ्यांवर येणारी वेगवेगळी संकटे आणि याला तोंड देणारा शेतकरी शेषराव मोहिते यांनी चित्रित केला आहे.

४. प्रामाणिकपणे शेतात राबणारा कर्जबाजारी शेतकरी आणि त्यामुळे त्याच्या मुलाला करावी लागणारी आत्महत्या कादंबरीत चित्रित झाली आहे. आज सर्वत्र चर्चीला जाणारा हा विषय शेषराव मोहिते यांनी जवळपास १५ ते २० वर्षापूर्वी आपल्या लेखनातून समाजासमोर मांडलेला दिसतो.

५. शेतकरी कुटुंबातील व्यक्तिंबरोबरच बैल, म्हैस, गाई इत्यादी जनावरांनाही तेवढेच महत्त्व असते. ते कुटुंबातीलच एक घटक आहेत असे समजून त्यांचीही शेतकरी जिवापाड देखभाल करीत असतो, याचे वास्तव मोहिते यांच्या कादंबरीत पहावयास मिळते.

६. शेतकरी कुटुंबातील तरुण शिक्षण घेऊन शेतीशी जुळलेली नाळ कधीही तोडत नाही. आजचा तरुण मात्र शिक्षण घेऊन गावापासून, घरापासून दूर जातो, याचे वास्तव लेखकाने या कादंबऱ्यांतून मांडले आहे.

७. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबरोबरच कोलमडणाऱ्या शिक्षणव्यवस्थेवरही भाष्य करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शेषराव मोहिते यांची कादंबरी करते. आजची शिक्षण व्यवस्था ही कशी निष्क्रीय आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे.

८. शेतकऱ्यांची पिळवणूक करणारे दलाल, व्यापारी, धूर्त शासन आणि प्रशासन यांचाही समाचार या कादंबऱ्यांतून लेखकाने घेतलेला आहे.

९. गावोगावचे सावकार हरिबासारख्या शेतकऱ्याला कर्ज देऊन त्याची जमीन बळकावण्यासाठी कट, कारस्थाने रचतात आणि त्या शेतकऱ्याला बळीचा बकरा बनवितात. त्याच्या असहाय्यतेचा फायदा घेतात हे शेषराव मोहिते यांच्या 'असं जगणं तोलाचं' मधून दिसून येते.

१०. सावकाराचे कर्ज, अनियमित निसर्ग, असंतुलित पर्यावरण, उत्पादित मालाला बाजारभावाची नसलेली हमी इ. अनेक समस्यांवर मात करूनही हा शेतकरी स्वाभिमानाने जीवन जगतो याचे वास्तव 'असं जगणं तोलाचं' मधून आले आहे.

११. शेतकरी कुटुंबातील तरुण शेतीसुधारणेचे उरी स्वप्न वाळगून शेतीविषयक शिक्षण घेतो. या शिक्षणाचा त्याच्या शेती सुधारणेसाठी काहीही उपयोग होत नाही, त्याच्या जीवनात अस्थैर्य निर्माण होते, एका अर्थाने त्याच्या जीवनाची ही धूळपेरणी ठरते, याचे वास्तव 'धूळपेरणी' या कादंबरीमधून आल्याचे दिसते.

१२. स्वत: अशिक्षित असूनही मुलांच्या शिक्षणासाठी आग्रह धरणारीर, गरीब कुटुंबात स्वाभिमानाने जीवन जगणारी आणि पडत्या काळात आपल्या कुटुंबाला धीर देणारी स्त्री शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यांत येते.

१३. राजकारणी मंडळी कृषीविद्यापीठामध्ये कशाप्रकारे राजकारण करतात आणि त्याचे परिणाम विद्यार्थ्यांना कसे सहन करावे लागतात याचेही दर्शन 'धूळपेरणी' मधून होते.

१४. शेषराव मोहिते यांनी 'असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' या कादंबऱ्यांमधून एकाच कुटुंबातील तीन पिढ्यांचा इतिहास चित्रित केला आहे. पहिली पिढी अशिक्षित आहे, तिचे प्रतिनिधीत्व हरिबा करतो. दुसरी पिढी अशिक्षित नामू आणि गोपाळ यांची तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधीत्व श्रीराम हा शिक्षित तरुण करतो. असा तीन पिढ्यांचा इतिहास दोन कादंबऱ्यांमधून मांडला आहे. अशिक्षितांकडून-शिक्षितांकडे वाटचाल करणारे कुटुंब शेतातील पारंपरिकता सोडून आधुनिक पद्धतीने शेती करण्याचा प्रयत्न करते.